आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार ४ मे २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. मुंबईत गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या जागतिक वेव्हज् अर्थात जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन परिषदेचा आज होणार समारोप.

2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वायुसेनेचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांची घेतली भेट.

3. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल उद्या दुपारी १ वाजता जाहीर होणार.

4. विदर्भात पुढील तीन दिवस वादळी प्रजन्यमानाचा हवामान खात्याकडून इशारा चंद्रपूर मध्ये गारपीट.

<u>वेव्हज् परिषद समारोप</u>

मुंबईत गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या जागतिक वेव्हज् अर्थात जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन परिषदेचा आज समारोप होत आहे. चित्रपट निर्मिती या विषयावर सत्रं आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन आज करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात ९० हून अधिक देशांतले दहा हजारांहून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.केंद्रीय माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी एका सांस्कृतिक सत्राला संबोधित करताना वेव्हजमध्ये सहभागी झालेला प्रत्येक निर्माता एक स्टार म्हणून उदयास येत असल्याच सांगितल. .क्रिएट इन इंडिया चॅलेंज मध्ये भाग घेणाऱ्या संगीतकारांनी त्यांच्या सादरीकरणाद्वारे भारताचे सार टिपले आहे असे जाजू यांनी नमूद केले. आकाशवाणीसोबत बोलतांना जाजू म्हणाले की वेव्हज गुंतवणूक, व्यवसाय, कला आणि संस्कृतीसाठी एक अविश्वसनीय टप्पा आहे, जो स्वतःला लोकचळवळ म्हणून स्थापित करत आहे.

*ये अपने आप में एक अविस्मरणीय रहा है। ना केवल इंटरनेशनल पार्टिसिपेशन बहुत जोरदार था, साथ ही साथ बिजनेस भी बहुत हुआ है। इन्वेस्टमेंट अनाउंसमेंट्स हुए है, वेव्हज बाजार में खरीद फरोक्त हुई है। वर्ल्ड की टॉप मीडिया एंटरटेनमेंट कंपनीस यहां पर शामिल रहे। कल्चरल प्रोग्राम बहुत अच्छे रहे। किसी किस्म का हमें।कोई कंप्लेंट यहाँ पर नहीं मिला और ये अपने आप मे एक पीपल्स वेव्हज बनके निकल के आया है ये पहला ऑडिशन.*

दरम्यान आज परिषदेच्या समारोपाच्या दिवशी इन्फ्लुएन्सर्ससाठी सोशल मीडिया जाहिरातींसाठी सर्वोत्तम पद्धती या विषयावर एक समर्पित ब्रेकआउट सत्र आयोजित करण्यात आले होते.पॅनेलमध्ये सहेली सिन्हा, संचालिका, एएससीआयआय; शिबानी अख्तर, चित्रपट अभिनेत्री आणि इन्फ्लुएन्सर; मयंक शेखर, यांचा समावेश होता. तुमची विश्वासार्हता जपा, तुमच्या सीमा निश्चित करा, प्रामाणिकपणे संवाद साधा असा

सल्ला यावेळी सदस्यांनी सोशल मीडियामधील इन्फ्लुएन्सर्सना दिला. याशिवाय आज परिषदेत ओटिटी प्लॅटफॉर्म .कंटेट पायरसी तसेच मनोरंजन स्टार्टअप मध्ये गुंतवणूक या विषयावर सुद्धा चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कम्युनिटी रेडिओ

कम्युनिटी रेडिओच्या देशभरात सुरु असलेल्या कार्याची, माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल मुरुगन यांनी प्रशंसा केली आहे. ते काल मुंबईत वेव्हज् परिषदेत कम्युनिटी रेडिओच्या उदघाटन सत्राला संबोधित करताना बोलत होते. नवोन्मेष श्रेणीत सांगली जिल्ह्यातल्या येरळा वाणी या कम्युनिटी रेडिओला राष्ट्रीय पातळीवर पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल बोलताना येरळा वाणीच्या केंद्र अधिकारी नीता जोशी म्हणाल्या.....

*एका कुटुंबामध्ये वारंवार मुलीच होतात म्हणून त्या स्त्रीचा छळ होत होता. तिचा नवरा दुसरं लग्न करणार होता,पण दरम्यान त्याच्या ऐकण्यामध्ये येरळा वाणी वरचा कार्यक्रमाला ज्या कार्यक्रमामध्ये मुलीच होण्यासाठी स्त्रीच जबाबदार आहे असं नाही तर पुरुष हा जबाबदार आहे असं सांगताना डॉक्टर आणि एक्स आणि वाय गुणसूत्रांची माहिती दिली होती. ही माहिती ऐकल्यानंतर तिच्या नवऱ्यानं दुसऱ्या लग्नाचा निर्णय बदलला आणि या मुली म्हणजे माझी मुलंच आहेत म्हणजे मुलगेच आहेत असं त्यांनी आपल्या आई वडिलांना समजावून सांगितलं आणि त्यानंतर या कुटुंबामध्ये जो बदल झाला या सगळ्याविषयी आम्ही एक कार्यक्रम तयार केला ज्यामध्ये सुनंदाची मुलाखत घेतली आणि हा ऑडिओ प्रोग्राम आम्ही स्पर्धेसाठी पाठवला तर कम्युनिटी रेडियो स्टेशनचा या स्पर्धेमध्ये मोस्ट इनोव्हेटिव्ह प्रोग्राम कम्युनिटी एंगेजमेंट या कॅटेगरीमध्ये हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला*

जत तालुक्यात जालिहाळ बुद्रुक आणि परिसरात या केंद्राचे प्रसारण ऐकू येते

पहलगाम दहशतवादी हल्ला

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी वायुसेनेचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांची भेट घेतली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानात वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची आहे. दरम्यान पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान आणि पाकिस्तानी नेते बिलावल भुट्टो यांच्या एक्स अकाऊंटवर आज भारताने बंदी घातली. पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानची चोहोबाजूंनी नाकाबंदी करायला सुरुवात केली आहे. त्या अंतर्गतच ही कारवाई करण्यात आली आहे. राजस्थानच्या श्रीगंगानगर इथं भारतीय हद्दीत आलेल्या पाकिस्तानी सैनिकाला भारतीय जवानांनी ताब्यात घेतलं. या पाकिस्तानी सैनिकाची सीमा सुरक्षा दलाकडून चौकशी सुरू आहे. यानंतर सीमा सुरक्षा दलाने श्रीगंगानगर भागात सुरक्षा व्यवस्था आणखी वाढविली आहे.

अॅप

भारत निवडणूक आयोग लवकरच संबंधित भागधारकांसाठी विविध कामांकरता उपयोगी पडेल असं 'ECINET' हे मोबाईल अॅप लॉँच करणार आहे. आयोगाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या विविध ४० मोबाईल आणि वेबसाईट अॅप् चा समावेश या एकाच अॅपमध्ये असेल. या अॅपचा उपयोग मतदार, निवडणूक अधिकारी, राजकीय पक्ष आणि समाजातले इतर विविध संबंधित घटक करू शकतात. ECINETचा दर्शनीभाग हा दिसायला आकर्षक असेल तसंच वापरायला सोपा असेल. तसंच या अॅपमुळे विविध अॅप्स डाऊनलोड करून त्यात वेगवेगळं लॉग-इन करून मग माहिती संकलित करायचं जिकिरीचं काम आता या नव्या अॅप मुळे वाचणार आहे. तसंच या नवीन अॅपवर मिळणारी माहिती ही आयोगाकडून दिली जाणारी अधिकृत माहिती असल्यानं ती त्याची विश्वासार्हताही अधिक असेल.

बारावी निकाल

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या १२ वी परीक्षेचा निकाल उद्या दुपारी १ वाजता जाहीर होणार आहे. विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुण मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर पाहता येतील.

नीट

वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठीची नीट ही चाचणी परीक्षा आज होत आहे. राष्ट्रीय चाचणी संस्था एनटीएच्या वतीनं आज देशातल्या पाच हजार केंद्रावर आणि परदेशातील तेरा केंद्रांमध्ये ही परीक्षा होत आहे. या परीक्षेसाठी साडेबावीस लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून राज्यात ३५ शहरांमध्ये दोन लाख ७९ हजार विद्यार्थ्यांनी ही परिक्षा दिली आहे.

हवामान

पूर्व विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये तसेच अमरावती आणि यवतमाळ येथे पुढील तीन दिवस तुरळ ठिकाणी विजेच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली असून पाच ते सहा मे दरम्यान भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली येथे अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्ट देखील घोषित करण्यात आला आहे दरम्यान आज सर्वात जास्त तापमान अकोला येथे ४४ पूर्णांक तीन अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले आहे नागपूरचे तापमान ४१. पूर्णांक 6 अंश सेल्सिअस होते. नागपूर मध्ये संध्याकाळ पासूनच ढगाळ वातावरण असून नागपूर चंद्रपूर वर्धा येथे येत्या एक तासात गारपिटीची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे आज दुपारच्या सुमारास चंद्रपुर जिल्ह्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह गारपीटीचा वर्षाव झाला. या गारपीठामुळे आंबा आणि पालेभाज्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून वर्तविली जात आहे.

आयपीएल

आयपीएल क्रिकेटमध्ये, राजस्थान रॉयल्सने काही वेळापूर्वी कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर २०७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यजमान कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध 3 षटकांत 2 गडी गमावून 26 धावा केल्या होत्या. प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेत, कोलकाताने निर्धारित २० षटकांत ४ बाद २०६ धावा

केल्या. आंद्रे रसेलने नाबाद ५७ आणि अंगकृष्ण रघुवंशी यांनी ४४ धावा केल्या.राजस्थानकडून जोफ्रा आर्चर, युधवीर सिंग चरक, महेश थीकशन आणि रियान पराग यांनी प्रत्येकी एक गडी बाद केले. या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना पंजाब किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात धर्मशाला इथं होणार आहे. संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल

## खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा

सातव्या 'खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धे'ला आजपासून बिहारमधे सुरुवात होत आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांच्या हस्ते आज संध्याकाळी पाटणा इथे या स्पर्धांचं उदघाटन होणार आहे. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे देखील यावेळी उपस्थित असतील.

******